असा. क्र. ५६ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, डिसेंबर २४, २००४/पौष ३, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.**—राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम. | ४९०-४९३ |

दिनांक २४ डिसेंबर २००४ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २४ डिसेंबर २००४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर या पदांसाठीच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे, विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर यांच्या निवडणुका, तीन महिन्यांच्या कालावधीकरिता तात्पुरत्या



[किंमत : ९-०० रुपये]

लांबणीवर टाकण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २१ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २००४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अध्यादेश " असा करण्यात आला आहे), प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २६.

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर यांचा वाढीव पदावधी हा दिनांक १८ नोव्हेंबर २००४ रोजी समाप्त होणार होता ;

**आणि ज्याअर्थी,** विवक्षित महानगरपालिकांमधील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या पोट-निवडणुका तसेच महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील सहा जागांसह अकरा जागा भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या निवडणुका यांच्यामुळे, विवक्षित महानगरपालिकांच्या महापौर व उप महापौर यांचा पदावधी आणखी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी वाढविण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे (सुधारणा) अध्यादेश, २००४ हा, दिनांक १७ नोव्हेंबर २००४ रोजी प्रख्यापित केला आहे ; २००४ चा महा. अध्या. ३३.

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांमुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे (सुधारणा) अध्यादेश, २००४ द्वारे सुधारित केलेल्या उक्त अध्यादेशाचे, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी, आता,** भारतीय गणराज्याच्या पंचावनाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :— २००४ चा महा. अध्या. ३३.

संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २१ ऑगस्ट २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचित करील, अशा त्या आधीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीकरिता, अंमलात राहील ; आणि त्यानंतर समाप्त होईल. या अधिनियमाच्या समाप्तीनंतर, तो जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आला होता अशा रीतीने मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ लागू होईल. १९०४ चा मुंबई १.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " महानगरपालिका " याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये घटित केलेली महानगरपालिका असा आहे ; १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(ख) महानगरपालिकेच्या संबंधात " संबद्ध अधिनियम " याचा अर्थ, उपरोक्त खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला संबद्ध अधिनियम, असा आहे ;

(ग) या अधिनियमात वापरलेले परंतु येथे व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, महानगरपालिकेच्या संबंधात संबद्ध अधिनियमामध्ये त्यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

महापौर व उप महापौर पदांसाठीच्या निवडणुका पुढे ढकलणे व त्यांचा पदावधी वाढविणे.

३. (१) संबद्ध अधिनियमांमध्ये किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयामध्ये, हुकूमनाम्यांमध्ये किंवा आदेशामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत किंवा कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे राज्य शासन **राजपत्रामध्ये** अधिसूचित करील अशा, त्या आधीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त कालावधी " असा केला आहे), महानगरपालिकेच्या महापौर व उप महापौर पदांसाठी, कोणतीही निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ख) उक्त कालावधीनंतर निवडून द्यावयाच्या महापौर व उप महापौर यांचा पदावधी हा, निर्वाचित पालिका सदस्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होणार असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महापौर आणि उप महापौर, त्यांच्या या अधिनियमाद्वारे वाढविलेला पदावधी समाप्त झाल्यानंतरही, संबद्ध अधिनियमान्वये नवीन महापौर किंवा उप महापौर निवडून येईपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला असेल अशा महापौर आणि उप महापौर यांचे अधिकार आणि विवक्षित कृतींचे विधिग्राह्यीकरण.

४. ज्यांचा पदावधी कलम ३ अन्वये वाढविण्यात आला असेल किंवा यथास्थिती, वाढविण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल असे महानगरपालिकांचे सर्व महापौर आणि उप महापौर, अशा संपूर्ण वाढीव कालावधीत असे महापौर आणि उप महापौर म्हणून सर्व अधिकारांचा वापर करण्यास, सर्व कर्तव्यांचे पालन करण्यास व सर्व कार्ये पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व ते सक्षम असतील ; आणि उक्त कालावधीमध्ये त्यांच्यापैकी कोणीही केलेली कोणतीही कृती, वाढीव कालावधीत अशा महापौरांना आणि उप महापौरांना संबद्ध अधिनियमाखालील महापौरांच्या व उप महापौरांच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करू शकले नसते, सर्व किंवा कोणत्याही कर्तव्याचे पालन करता आले नसते किंवा सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडता आली नसती, याच केवळ कारणावरून अवैध ठरणार नाही किंवा त्या कृतीस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.

महापौर आणि उप महापौर यांच्या निवडणुका घेण्याची व्यवस्था.

५. या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाद्वारे वाढवलेला विद्यमान महापौरांचा व उप महापौरांचा पदावधी संपण्यापूर्वी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, महानगरपालिकांच्या अधिकाऱ्यांकडून संबद्ध अधिनियमाच्या किंवा त्याखालील नियमांच्या तरतुदींनुसार, महानगरपालिकेचा महापौर आणि उप महापौर यांच्या निवडणुका घेण्याची व्यवस्था करण्यात येईल.

अडचण दूर करणे.

६. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत संबद्ध अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उदभवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप अडचण दूर करण्यासाठी, आदेशाद्वारे त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

२००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २६ यांचे निरसन व व्यावृत्ती.

**७.** (१) महाराष्ट्र महानगरपालिका (राज्य विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका आणि इतर विवक्षित निवडणुका यांच्यामुळे महापौर व उप महापौर पदांसाठीच्या) निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलणे अध्यादेश, २००४, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. २६.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.